# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील **अधिष्ठाता** संवर्गातील रिक्त असलेले पद नियमित वेतनश्रेणीत भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या recruitment@thanecity.gov.in या ई-मेल आयडी वर ऑन लाईन पध्दतीने त्यांचे अर्ज व अर्जात नमुद केलेली प्रमाणपत्रे scan करुन दि.०३/०३/२०१७ ते दि.१६ /०३ /२०१७ पर्यंत संपूर्ण तपशीलासाह पाठवावे. अर्जासोबत नमुद केलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही.

| पदनाम | वयोमर्यादा | वेतन बॅंड अधिक ग्रेड पे | एकुण जागा | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| अधिष्ठाता | ५० वर्षे | रु. ३७४००-६७००० अधिक ग्रेड पे रु. १००००/- | ०१ (खुला प्रवर्ग) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वैद्यक क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी व इतर शैक्षणिक पात्रता.<br>२) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय अथवा संस्थेत प्राध्यापक (Professor) किंवा सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) किंवा रिडर (Reader) यापैकी कोणत्याही पदावर काम केल्याचा १० वर्षाचा अनुभव व त्यापैकी किमान ५ वर्षे विभागात प्राध्यापक (Professor) म्हणून काम केलेले असणे आवश्यक. विभागाचा प्रमुख (Head of Department) म्हणून काम केलेल्यांना प्राधान्य. |

**वयोमर्यादा :-**

१.अनुभव व विशेष गुणवत्ताधारकांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथीलक्षम

२.ठाणे महापालिकेच्या सेवेत कार्यरत असणा-या उमेदवारांना वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.

**टिप:-**

१) उमेदवारांना मुलाखतीत मिळालेले गुण जर समान असतील तर वयाने ज्येष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

२) महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र.मातंस२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.४ फेब्रुवारी २०१३ अन्वये गट अ,ब व क मधील कर्मचा-यांना एमएस-सीआयटी या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे.

३) उमेदवाराने सादर केलेला जातीचा,अनुभवाचा दाखला अथवा इतर कोणताही दाखला बोगस आढळुन आल्यास अशा उमेदवारावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकेल व त्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारावर राहील.

४) भरती प्रकियेचा संपूर्ण तपशील ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. त्यासाठी वैयक्तिक स्वरुपात उमेदवारांनी पत्रव्यवहार करु नये अथवा संपर्क साधु नये.

५) विहित वयोमर्यादेतील शासकीय /निमशासकीय कर्मचा-यांने त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावीत व अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमुद करावा. संबंधित विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करावे.

**अटी व शर्ती :-**

१) निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

२) उमेदवारांनी जाहिरातीला अनुसरुन recruitment@thanecity.gov.in या ई-मेल आयडी वर आपले अर्ज व अर्जात नमुद केलेली प्रमाणपत्रे scan करुन दि.०३/०३/२०१७ ते दि.१६ /०३ /२०१७ च्या रात्रौ १२.०० वाजेपर्यंत सादर करावेत. पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही.

३) (i) शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि.२७ जुन २०११ नुसार उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

a. (ii) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

b. (iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारासाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

४) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८/३/२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.१/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि.२८/३/२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

५) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १/११/२००५ नुसार लागु करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागु राहील.

७) उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येईल. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधीत उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

८) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय वयोमर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

९) स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा.

१०) शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराच्या सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

११) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१२) नियुक्तीपुर्वी निवड झालेल्या उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे व कागदपत्रांची पडताळणी तज्ञ व्यक्तींकडून करण्यात आल्यानंतरच नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

१३) **जे अर्जदार भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरणार नाहीत अशा अर्जदारांना याबाबत वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही आणि अर्जदारास त्याबाबत विचारणा करता येणार नाही.**

१४) सदर नियुक्त्यांसाठी परिविक्षाधिन कालावधी दोन वर्षांचा राहील. सदरच्या परिविक्षाधीन कालावधीमध्ये वाढ करणे अथवा सेवा संपुष्ठात आणणे याबाबतचा अधिकार महापालिकेने राखून ठेवलेला आहे.याबाबत कोणत्याही उमेदवारास तक्रार अथवा वाद करता येणार नाही.

१५) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१६) सदर जाहिरातीनुसार भरती स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे , प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार प्रशासन राखुन ठेवत आहे.

१७) उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

१८) एखादया अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१९) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल/शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

ठिकाणः ठाणे<br>
दिनांक :

अतिरिक्त आयुक्त - १<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(अर्ज भरण्यापूर्वी जाहिरात वाचावी)

**अर्जाचा नमुना**

'-------------' या पदासाठी अर्ज

उमेदवाराचे
अलिकडील
छायाचित्र

प्रति,
मा.आयुक्त सो.
ठाणे महानगरपालिका,ठाणे

संपुर्ण नावः -------------------------------------------------------------------------------------------------------

पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------ दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.-------------------------------------------------------------

जन्मतारीख

| तारीख | महिने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि.१६/०३/२०१७
रोजीचे वय

| दिवस | महिने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

लिंग :- पुरुष ☐ स्त्री ☐

राष्ट्रीयत्व :- मातृभाषा :-

**जातः-** **जातीचा प्रव्रर्गः-** **जात वैधता प्रमाणपत्र** (आहे/नाही)**:-**

ठाणे महानगरपालिका कर्मचारी (आहे / नाही) ☐

शासकीय कर्मचारी (आहे / नाही) ☐

**शैक्षणिक अर्हता :-**

| **उत्तीर्ण केलेली परिक्षा** | **विद्यापीठ/मंडळाचे नाव** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **मिळालेले गुण** | **एकुण गुण** | **टक्केवारी/श्रेणी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**अनुभवः-**

| **संस्थचे नाव** | **पदनाम** | **कालावधी** | | **अनुभव प्रमाणपत्र जोडले आहे / नाही** |
|---|---|---|---|---|
| | | वर्ष | महिने | |
| | | | | |
| | | | | |

MBBS रजिस्ट्रेशन क्रमांक : ☐ नुतनीकरण दिनांक : ☐

PG डिग्री रजिस्ट्रेशन क्रमांक: ☐ रजिस्ट्रेशनचा दिनांक : ☐

PG डिप्लोमा रजिस्ट्रेशन क्रमांक: ☐ रजिस्ट्रेशनचा दिनांक : ☐

उमेदवारास पुर्वी फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणात शिक्षा झाली होती का? किंवा सद्यस्थितीत त्यांचेवर फौजदारी अथवा दिवाणी गुन्हा दाखल आहे का? असल्यास तपशील लिहावा. ---------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

ठिकाण : ठाणे                                                                                   अर्जदाराची सही

दिनांक:  /  /२०१७                                                                               (अर्जदाराचे नांव)

---

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना
प्रतिज्ञापन

नमुना अ (नियम ४ पहा)

मी.श्री/श्रीमती/कुमारी ----------------------------------------------------------------------------
श्री. --------------------------------------------- यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी, वय--------- वर्ष
राहणार --------------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,
१. मी -------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला ------------ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ                                                                                              (---------------------)
दिनांक :                                                                                            अर्जदाराचे सही

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार ती पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्यांबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

ठिकाण :ठाणे

अर्जदाराची सही

दिनांक:  /  /२०१७

(अर्जदाराचे नांव)

स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ता :-